Exh.29

रे. क. नं. ११/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर, राधानगरी

यांचे कोर्टात...

१. श्री. प्रविण नामदेव ढवण वगैरे ८ ........ वादी

विरूध्द

१. श्री. प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ६ ......... प्रतिवादी

Order-
Seen and filed.
Sd/-
Jt.C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 8/4/2026

यातील वादीतर्फे साक्षीदार यांचे नि. ५ च्या पुष्टयार्थ ॲफिडेव्हीट

ॲफिडेव्हीट

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. विलास कुंडलिक कदम व. व. ७०, धंदाः शेती, रा. नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर देवाची शपथ घेवून ॲफिडेव्हीट करतो की,

१. मला वादी, प्रतिवादी माहितीचे आहेत. तसेच मौजे नरतवडे, येथील गट नं. ५०२, ५०३, ५०४, ५०५, ५०६, ५०७ हया सर्व जमीनी माहितीच्या आहेत. माझ्या स्वतःचे मालकीची गट नं. ४४० मौजे नरतवडे येथील जमीन सदर जमीनीच्या बांधाला बांध लागून पश्चिम बाजूला असून ती आम्ही स्वतः कसतो.

२. वर नमुद केलेल्या गट नं. ५०२ ते ५०७ या जमीनीचे एकूण क्षेत्र २९.५ गुंठे असून ती जमीन प्रविण नामदेव ढवण, महेश नामदेव ढवण, एकनाथ आत्माराम ढवण, दामोदार आत्माराम ढवण, बळवंत आत्माराम ढवण, अशोक दिनकर ढवण, प्रकाश दिनकर ढवण व विलास शंकर ढवण हे

Assistant Suprintendent

सर्व स्वतः कष्ट मशागत करून गेले ६० वर्षापूर्वीपासून कसत असलेची मला प्रत्यक्ष माहिती आहे. आमचे वडीलांचेकडून त्यापूर्वीपासूनच वरील सर्व लोक जमीन कसत असलेचे वडीलांनी आम्हाला सांगितलेले आहे. सदर जमीनीमध्ये ऊस व भात अशी पिके वादी घेत आहेत याची मला प्रत्यक्ष माहिती आहे. आमचे जमीनीत देखील आम्ही ऊस व भात अशीच पिके घेत आहोत.

३. वर नमुद केलेल्या जमीनीशी प्रतिवादी नं. १ ते ५ यांचा कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्कसंबंध नाही. सदर जमीनीमध्ये त्यांची कधीही वहिवाट नव्हती अगर नाही.

म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी ता. १८.०३.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

(ॲड. डी. एम. पोतदार)

## प्रतिज्ञा

मी यातील वादीतर्फे साक्षीदार श्री. विलास कुंडलिक कदम व. व. ७०, धंदाः शेती, रा. नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी ता. १८.०३.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Vilas Kundlik Kadam
Age... 70 ...Occu... Agri
of... Nartawade, Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt.... D.M. Potdar
Adv. Whom I Know personally
Dated.. 18/3/2026

Assistant Superintendent